**ऑगस्ट मध्ये करावयाची शेतीची करावयाची कामे. (पुणे जिल्हा)**

**कृषिविद्या –**

आडसाली ऊस –

१) लवकर लावलेल्या आडसाली ऊस पिकास पिक ६-८ आठवड्याचे झालेवर ४० टक्के नत्राचा दुसरा हप्ता द्या.

२) आडसाली ऊसाची लागवड १५ ऑगस्टनंतर करू नका. लागण होऊन ६ ते ८ आठवडे झाले असल्यास हेक्टरी १६० किलो नत्राचा (३५० किलो युरीया) दुसरा हप्ता द्या. युरीया खतातील नत्र पिकास हळूहळू व अधिक काळ उपलब्ध होत राहावा म्हणून निंबोळी पेंडीची बारीक भुकटी (३०० मेश) एक किलो व सहा किलो युरीया या प्रमाणात मिश्रण करावे. निंबोळी पेंड व युरीया मिश्रणामध्ये थोडे पाणी शिंपडून मिश्रण चांगले मिसळावे म्हणजे निंबोळी पेंड युरीयाच्या कणावर चिकटून बसते. निंबोळी पेंडीचा वापर नत्राच्या दुस-या व चवथ्या हप्त्याच्या वेळी करावा.

३) खोडकीडीचा प्रादुर्भाव १० टक्क्यापेक्षा जास्त दिसून आल्यास वाळलेल्या सुरळ्या काढून घेऊन अळीसह त्यांचा नायनाट करा. त्यानंतर एन्डोसल्फान १४ मिली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून किंवा कार्बारील ५० टक्के ४० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून हेक्टरी ५०० लिटर या प्रमाणात फवारावे. आवश्यकता भासल्यास १५ दिवसांच्या अंतराने २ ते ३ वेळा फवारणी करावी किंवा ऊस लागवडीनंतर ४० ते ४५ दिवसाने ३-४ ट्रायकोकार्डचा १० दिवसांच्या अंतराने ६ वेळा प्रती हेक्टरी वापर करावा.

४) जास्त चुनायुक्त जमिनीत शक्यतो ऊसाची लागवड करू नये. बांधणीपुर्वी ऊसावर केवडा दिसताच ०.५ टक्के हिराकस या संयुगाचे द्रावण १५ दिवसांचे अंतराने ३-४ वेळा पिकावर फवारावे (२.५ किलो हिराकस ५०० लिटर पाण्यात विरघळावे) ऊस लागणीच्या वेळी किंवा बांधणीच्यावेळी प्रती हेक्टरी २० ते २५ किलो हिराकस कुजलेल्या शेणखतात मिसळून सरीमध्ये रांगोळी पध्दतीने टाकावे.

५) ऊसावरील लोकरी मावा व पिठ्या ढेकूण (मिलीबग) यांचे नियंत्रणासाठी मागे दिल्याप्रमाणे उपाययोजना करावी.

हळद –

१) नत्राचा दुसरा हप्ता द्या.

२) पीक संरक्षण करा.

३) हळदीची लागवड होऊन १२ आठवडे झाले असल्यास हेक्टरी ६० किलो नत्राचा ( १६० किलो युरीया) दुसरा हप्ता द्या व भरणी करा.

४) कंदमाशी दिसताच पुढीलपैकी एक कीडनाशक जमिनीत मिसळावे व नंतर हलके पाणी द्यावे.

- ५० टक्के दाणेदार क्विनॉलफॉस (इकॅलक्स) २० किलो प्रतीहेक्टर
- १० टक्के दाणेदार फोरेट (थिमेट) २० किलो प्रती हेक्टर
- कार्बारील १० टक्के भुकटी २० किलो प्रती हेक्टर धुरळावी.

कीडनाशकाचे तीन हप्ते महिन्याच्या अंतराने द्यावेत.

खरीप ज्वारी –

१) पेरणी झालेल्या क्षेत्रात २५ ते ३० दिवसांनी ५० ते ६० किलो नत्राचा दुसरा हप्ता द्या.

२) जमिनीत ओल टिकविणेसाठी व पावसाने ताण दिल्यास खोल कोळपणी करा.

३) पिकास मातीची भर द्या. पावसाचा ताण पडल्यास पाणी उपलब्धतेनुसार पिकाच्या संवेदनशिल वाढीच्या अवस्थेत संरक्षीत पाणी द्या.

४) ज्वारीवरील खोडमाशी, खोडकिडा, मावा, तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव दिसताच ५ टक्के निंबोळी अर्क अथवा एन्डोसल्फान ३५ टक्के १४ मि.ली. किंवा डायमेथोएट ३० टक्के १० मि.ली. + १० मि.ली. स्टिकर १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. अथवा खोडकिडीच्या नियंत्रणासाठी ५ ट्रायकोकार्ड व मावा, तुडतुडेच्या नियंत्रणासाठी क्रायसोपर्ला कार्नीयाच्या १० ते १५ हजार अळ्या प्रती हेक्टरी सोडाव्यात.

५) ज्वारीवरील हेलमिंथोस्पोरीयम ब्लाईट तांबडे चट्टे रोगाच्या नियंत्रणासाठी कॉपर ऑक्झीक्लोराईड २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यातून फवारावे. तसेच डावनीच्या नियंत्रणासाठी रिडोमिल एम.झेड.-७२, ४० ग्रॅम युरीया प्रती १० लिटर पाण्यातून फवारावे. दुसरी फवारणी १५ दिवसांनी करावी.

भात -

१) लागवड झालेल्या भात खाचरात भात लागवडीनंतर ८ ते १० दिवसांनी २० किलो निळे हिरवे शेवाळ प्रती हेक्टरी टाकावे. त्यामुळे हेक्टरी ३० किलोपर्यंत हवेतील नत्र स्थिरीकरण कले जाते. तसेच भात खाचरात वाढणारे रानटी (अवांछित) शेवाळ या पाणवनस्पतीचा बंदोबस्त होणेस मदत होते.

२) लावणीनंतर दर १५ दिवसांनी बेणणी (खुरपणी) करून भात खाचरातील तण नियंत्रण करावे किंवा तणनियंत्रणासाठी हेक्टरी २ ते ४ किलो ब्युटॉकोर ५० ई.सी. (मॅचेट) रोप लावणीनंतर ४ ते ५ दिवसांनी किंवा थायोबेकार्ब ५० ई.सी. (सॅटर्न) रोप लावणीनंतर १ ते २ आठवड्याने ४०० ते ५०० लिटर पाण्यातून तणे उगवणीनंतर खाचरात फवारावे.

३) तणनाशक फवारणी करणे अगोदर खाचरातील सर्व पाणी काढून टाकावे. व तणनाशक फवारणीनंतर २४ तासांनी पुन्हा खाचरात पाणी भरावे.

४) शेतात लावणी केलेली रोपे चांगली मुळे थरेपर्यंत २ ते ५ से.मी. पाणी ठेवावे. त्यानंतर पिकातील दाण्यात चिक भरेपर्यंत शेतात ५ से.मी. पाण्याची पातळी ठेवावी.
५) पावसाअभावी भात लागवड उशिरा होणार असेल व जास्त वयाची रोपे (महिना ते दिड महिना वयाची) लावावी लागणार असतील तर चुडातील रोपांची संख्या ७ ते ८ पर्यंत ठेवावी.

बाजरी –

१) नत्राचा दुसरा हप्ता द्या.

२) पीक संरक्षण करा.

३) शेत तणविरहीत ठेवा.

४) बाजरीचे पीक दाणे भरण्याच्या अवस्थेत असताना जमिनीतील ओलावा विचारात घेऊन संरक्षीत पाण्याची पाळी द्या. उशिरा पेरलेल्या बाजरीचे पिकावर निले भुंगेरे. सोशे या कीडींचा प्रादुर्भाव आढळून आल्यास १.५ टक्का क्विनॉलफॉस भुकटी हेक्टरी २० किलो या प्रमाणात धुरळावी. तसेच ज्यांना शक्य असेल त्यांनी प्रकाश सापळ्यांचा वापर करावा.

५) बाजरी लागण होऊन ३० दिवसांच्या आत एक चांगली खुरपणी व कोळपणी करून बाजरीचे शेत स्वच्छ ठेवावे. संकरीत बाजरी पिकास पेरणीनंतर ३० दिवसांनी ३० किलो नत्राचा (६५ किलो युरीया) दुसरा हप्ता द्या.

६) डाऊनी रोगाच्या नियंत्रणासाठी रिडोमील एम.झेड.-७२, ४० ग्रॅम + २० ग्रॅम युरीया प्रती १० लीटर पाण्यातून फवारावे. दुसरी फवारणी १५ दिवसांनी करावी.

भुईमूग –

१) पीक संरक्षण करा.

२) उपट्या वाणांसाठी पेरणीनंतर ३५ व ४५ दिवसांनी दोन वेळा पिकावर जास्त आ-या धरण्यासाठी २०० लीटरचा रीकामा ड्रम फीरवावा.

३) भुईमुगाच्या प्रत्येक झाडावर २ पाने गुडाळणा-या आळ्या दिसून आल्यास ५ टक्के निंबोळी अर्काची अथवा डायमेथोएट (रोगार) १० मिली अथवा कार्बारील ५० टक्के पाण्यात मिसळणारी पावडर ४० ग्रॅम किंवा मोनोक्रोटोफॉस (नुवाक्रॉन) १५ मिली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून हेक्टरी ५०० लिटर या प्रमाणात फवारावे. ठीपके व तांबेरा रागाच्या नियंत्रणासाठी कार्बेंडाझीम (बाविस्टीन) ५ ग्रॅम ट्रायडेमार्फ ७ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून हेक्टरी ५०० लिटर या प्रमाणात फवारावे.

सुर्यफूल –

१) नत्राचा दुसरा हप्ता द्या. पेरणीनंतर ३० दिवसांनी हेक्टरी ६५ किलो युरीया द्या.

२) आंतरमशागत करून पीक तणविरहीत ठेवा.
३) पाण्याच्या पाळ्या द्या. संपक्षीत पाणी द्या.
४) घाटे अळी व केसाळ अळी किवा अळ्या पाने करतडून खातात व पानाच्या फक्त शिरा राहतात. कीडींचा प्रादुर्भाव दिसून येताच खालील किटकनाशक फवारावे.
- ५ टक्के निंबोळी अर्क अथवा एन्डोसल्फान ३५ इ.सी. १००० मि.ली. किंवा क्विनॉलफॉस २५ इ.सी. १००० मिली ५०० लिटर पाण्यात मिसळून हेक्टरी फवारावे. कीडीची अंडी, पुंजके, अळ्या इ. गोळा करून नाश करावा. मॅलेथिऑन ५ टक्के किंवा क्विनॉलफॉस १.५ टक्के किंवा कार्बारील १० टक्के भुकटी २५ किलो प्रती हेक्टर या प्रमाणात धुरळावी. अथवा एस.ओ.एन.पी.व्ही. विषाणू ५०० एल.ई. ५०० लिटर पाण्यातून प्रतीहेक्टरी फवारावी.
५) करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास मॅन्कोझेब ७५ टक्के २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून हेक्टरी ५०० लिटर या प्रमाणात फवारावे.

तूर –
१) तूरीचे पीक फुलावर येणेपुर्वी पाने गुंडाळणा-या अळीच्या नियंत्रणासाठी अळीने गुंडाळलेली पाने हाताने तोडून नष्ट करावीत.
२) तुरीच्या पीकात प्रती हेक्टरी ५ या प्रमाणात वास (गंध) सापळे ठेवून घाटे अळी, पिसारी पतंग इ. किडीच्या प्रादुर्भावाचा अंदाज घ्यावा. तसेच या सापळ्यांच्या उपलब्धतेबाबत ग्रामविकास अधिका-यांशी संपर्क साधावा.
३) तुरीचे पीक कळीच्या अवस्थेत असताना तुरीच्या प्रत्येक एक मिटर ओळीतील झाडावर घाटे अळीच्या २ ते ३ अळ्या दिसताच किंवा प्रत्येक दिवशी वास सापळ्यात ८ ते १० घाटे आळीचे किंवा पिसारी पतंगाचे पतंग आढळून येताच खालील उपाययोजना करावी.
- पिकावर क्विनॉनफॉस २५ टक्के २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- दुसरी फवारणी पहिल्या फवारणीनंतर १५ दिवसांनी ५ टक्के निंबोळी अर्काच्या द्रावणाची करावी. त्यासाठी ५ किलो निंबोळीच्या बिया फोडून १० लिटर पाण्यात रात्रभर भिजत ठेवून दुस-या दिवशी निंबोळीचा अर्क पातळ फडक्यातून गाळून घ्यावा. या गाळून घेतलेल्या अर्कात पाणी टाकून संपुर्ण द्रावण १०० लिटर करावे. त्यातील अर्धा लिटर तयार केलेल्या द्रावणात टाकून चांगले ढवळावे व त्याची पिकावर फवारणी करावी. किंवा फेनवेलरेट ५ मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- तिसरी फवारणी दुस-या फवारणीनंतर १५ दिवसांनी अथवा ५ टक्के शेंगा किडलेल्या दिसून येताच एन.पी.व्ही. या नावाने ओळखणा-या घातक विषाणूंची करावी किंवा एन्डोसल्फान २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- फुले आणि फुलातील परागकण खाणारे भुंगे (सोशे) हाताने गोळा करून रॉकेलमिश्रीत पाण्यात

टाकून त्यांचा नाश करावा.

- मर रोगाने वाळलेली तसेच केवडाग्रस्त झाडे वरचेवर उपटून जाळून टाकावीत. कीडनाशक फवारणी शक्य नसल्यास १.५ टक्के क्विनॉलफॉस भुकटी अथवा २ टक्के मिथील पॅरेथिऑन भुकटी हेक्टरी २० किलो या प्रमाणात धुरळावी.

मुग, उडीद, चवळी इ. कडधान्ये -

- पेरणी केलेल्या मूग, उडीद, चवळी इ. कडधान्याचे पाने खाणारी अळी, मावा, तुडतुडे, सोसे या किडीपासून संरक्षण करा.

कारळा -

- कारळा पिकास राहिलेला ५० टक्के नत्राचा दूसरा हप्ता (हेक्टरी १० किलो नत्र) पेरणीनंतर १ महिन्यांनी द्या.

एरंडी –

पीक संरक्षण करा.

उंट अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास कार्बारील ५० टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी ५० ग्रॅम किंवा एन्डोसल्फान १५ मिली प्रती १० लिटर पाण्यात हेक्टरी ५०० लिटर या प्रमाणात फवारावे. पानावरील ठीपक्या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच मॅन्कोझेब (डायथेन एम-४५) किंवा ब्लायटॉक्स २५ ग्रॅम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

कापूस –

पीक संरक्षण करा.

बोंड अळीच्या नियंत्रणासाठी ७-८ ट्रायकोकार्ड प्रती हेक्टरी लावावेत अथवा क्विनॉलफॉस किंवा एन्डोसल्फान प्रती हेक्टरी १००० मिली याप्रमाणे १२ ते १५ दिवसांच्या अंतराने दोन वेळा फवारणी करावी. तुडतुडे आणि रस शोषण करणा-या किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास क्रायसोपर्ला कार्नीयाच्या १० ते १५ हजार अळ्या प्रतीहेक्टरी सोडाव्यात अथवा ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. अथवा डायमेथोएट ३० टक्के, १००० मिली, ५०० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. माईटस ( कोळी) या किडीच्या नियंत्रणासाठी पाण्यात मिसळणारे गंधक हेक्टरी २ किलो ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. रोगग्रस्त होणा-या कपाशीच्या प्रत्येक झाडास १ ग्रॅम याप्रमाणे फोरेटचा वापर करावा. लाल्या रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास २ टक्के डी.ए.पी. ची फवारणी करावी. कवडी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास डायथेन एम-४५ किंवा ब्लायटॉक्स २५ ग्रॅम १० लिटर पाण्यातून फवारणी १५ दिवसांच्या अंतराने करावी. अणुजीवजन्य करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास स्ट्रेप्टोसायक्लीन १ ग्रॅम + ब्लायटॉक्स २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात

मिसळून फवारावे.

सोयाबिन –

१) कोळपणी करा. शेत तणविरहीत ठेवा.

२) खोडमाशी व पाने खाणा-या अळीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्क अथवा एस.ओ.एन.पी.व्ही. विषाणू ५०० एल.ई. ५०० लिटर पाण्यातून प्रतीहेक्टरी फवारावे अथवा क्विनॉलफॉंस २० मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून हेक्टरी ४०० लिटर या प्रमाणात फवारावे. किंवा १.५ टक्के क्विनॉलफॉस भुकटी किंवा ५ टक्के मिथील पॅरेथिऑन हेक्टरी २० किलो या प्रमाणात धुरळावे.

३) पिकाच्या सुरूवातीच्या काळात चांगली खुरपणी करून शेत तणविरहीत ठेवा. कोळपणी करा.

फळबागा, भाजीपाला व फुलशेती

फळझाडे –

१) एप्रिल किंवा मे महिन्यात छाटलेल्या गावठी बोरीच्या फुटव्यावर अथवा मागील वर्षी लागवड केलेल्या बोरीच्या रोपावर सुधारीत जातीचे डोळे ठीगळ पध्दतीने भरा.

२) गावठी आंब्याच्या रोपावर आंब्याच्या सुधारीत जातीची कलमे मृदकाष्ठ पध्दतीने करा.

३) पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊन फळबाग लागवडीचे लक्ष्य ठरवावे.

४) ज्या ठीकाणी पाऊसमान अत्यंत कमी आहे. असा ठीकाणी उपलब्ध ओलाव्याचा जास्तीत जास्त उपयोग व्हावा म्हणून झाडाभोवती पाणी अडवा.

५) जूनमध्ये लागवड केलेल्या फळपिकांना काठीचा आधार द्या.

६) मृगबहार धरलेल्या फळझाडांना (लिंबूवर्गीय, डाळींब व पेरू) खते द्यावीत.

७) डाळींबात पाने व फळावरील ठीपके, पेरूवरील देवी आणि सिताफळावरील फळसड या रोगाच्या नियंत्रणासाठी बोर्डोमिश्रण ०.१ टक्का अथवा कार्बेन्डेझिम १० ग्रॅम कींवा बेनोमिल १० ग्रॅम किंवा मॅन्कोझेब २५ ग्रॅम + स्टीकर १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. पेरूवरील देवी रोगासाठी प्रोपीकोनाझोल ०.१ टक्का आवश्यकतेनुसार १० ते १५ दिवसांच्या अंतराने अंतराने फवारावे.

८) डाळींबाच्या फळातील रस शोषणा-या पतंगाच्या नियंत्रणासाठी ५० टक्के मॅलेथिऑन २० मिली. किंवा डायझिनॉन ५ मिली. + २० ग्रॅम गुळ व २ लिटर पाणी यांचे मिश्रण तयार करून त्यात १२ ग्रॅम व्हीनेगर मिसळावे. असे हे तयार झालेले विषारी मिश्रण प्लॅस्टीकच्या खोलगट भांड्यात घेऊन असे भांडे १० झाडास एक या प्रमाणात ठेवावे.

९) डाळींबावरील फळ पोखरणारी सुरश्या अळी, कोळी व पानावरील ठीपके या रोगाच्या एकत्रीत नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्क अथवा कार्बारील ५० टक्के ४० ग्रॅम, पाण्यात मिसळणारे

गंधक २५ ग्रॅम + कॉपरऑक्सीक्लोराईड

१०) डाळींबाच्या बागेतील सूत्रकृमींच्या नियंत्रणासाठी बहार संपल्यानंतर ताबडतोब डाळींबाची बाग पुर्णपणे उभी आडवी नांगरून घ्यावी. त्यानंतर प्रतीहेक्टर १५०० कीलो याप्रमाणे सर्व क्षेत्रावर वर्षातून एकदा याप्रमाणे २-३ वर्षे लिंबोळी पेंडीचा वापर करावा.

११) डाळींबाच्या फळावरील बिबव्या रोगाच्या नियंत्रणासाठी स्ट्रेप्टोसायक्लीन ५० ग्रॅम + कॉपर ऑक्झीक्लोराईड १२५० ग्रॅम प्रती ५०० लिटर पाण्यातून हेक्टरी फवारणी करावी. दुसरी फवारणी १५ दिवसांनी करावी.

१२) कागदी लिंबावरील पानातील अळी (लिफ मायनर) व पाने खाणा-या अळीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट (रोगार) १५ मिली. किंवा कार्बारील ५० टक्के (सेव्हीन) २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

१३) कागदी लिंबावरील खै-या रोगाच्या नियंत्रणासाठी १ ग्रॅम स्ट्रेप्टोसायक्लीन + २५ ग्रॅम कॉपर ऑक्झीक्लोराईड प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

१४) द्राक्षावरील उडद्या व दावन्या रोगाच्या नियंत्रणासाठी मॅलेथिऑन १० मिली. किंवा डायमेथोएट (रोगार) १० मिली + २५ ग्रॅम कॉपर ऑक्झीक्लोराईड किंवा बाविस्टीन १० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

१५) द्राक्षावरील करपा रोगाच्या नियंत्रणासाठी बाविस्टीन १० ग्रॅम किंवा ताम्रयुक्त बुरशीनाशक २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

१६) द्राक्षावरील केवडा किंवा भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी १ टक्का बोर्डोमिश्रण अथवा ३०० मेश गंधकाची भुकटी हेक्टरी २० किलो या प्रमाणात धुरळावी.

१७) बोरीवरील कीड व रोगापासून खालीलप्रमाणे संरक्षण करावे.-

- बोरीचे झाड फुलाच्या अवस्थेत येणेपुर्वी ५ टक्के निंबोळी अर्क अथवा एन्डोसल्फान १५ मिली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे म्हणजे पाने खाणारी हिरवी अळी, केसाळ अळी आणि पतंगाची हिरवी अळी इ. किडींचे नियंत्रण होईल
- केसाळ अळी आकाराने मोठी झाल्यास अशा अळ्या झाडांच्या फांद्या हलवून जमिनीवर पाडाव्यात व त्या गोळा करून रॉकेलमिश्रीत पाण्यात त्यांच्या नाश करावा.
- जेव्हा झाडे जास्तीतजास्त फुलाच्या अवस्थेत असतील आणि झाडावर भरपूर मधमाशा दिसत असतील अशा वेळी शक्यतो किटकनाशके फवारू नयेत.
- झाडावर ७० टक्के फळधारणा झाल्यावर व फळे वाटाण्याच्या आकाराची झाल्यावर फळ पोखरणारी अळी व फळातील माशी या किडीच्या आणि रोगाच्या एकत्रीत नियंत्रणासाठी कार्बारील ५० टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी (सेव्हीन) ५० ग्रॅम किंवा एन्डोसल्फान १५ मि.ली. किंवा मोनोक्रोटोफॉस (नुवाक्रॉन) १५ मि.ली. + पाण्यात विरघळणारे गंधक २५ ग्रॅम किंवा कॅरेथिऑन ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पंधरा दिवसांच्या अंतराने ३ ते ४ वेळा काढणीपुर्वी १५

दिवस अगोदरपर्यंत फवारावे.

- भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ३०० मेश गंधक भुकटी हेक्टरी २० किलो या प्रमाणात धुरळावी.

भाजीपाला –

- रब्बी भाजीपाला लागवडीसाठी रोपे तयार करण्याकरीता रोपवाटीकेत गादी वाफ्यावर वांगी, टोमँटो, कोबी, फुलकोबी, ढोबळी मिरची यांच्या रोपांची लागण करा.

१) पिकाचे नाव – वांगी

- सुधारीत जाती- वैशाली, मांजरी, गोटा, प्रगती, कृष्णा (सं)

- प्रती हेक्टरी बियाणे – ०.५ किलो

२) पिकाचे नाव – टोमँटो

- सुधारीत जाती – पुसा रुबी, पुसा अर्ली डवॉर्फ, धनश्री, भाग्यश्री, राजश्री(सं)

-प्रती हेक्टरी बियाणे- ०.४ ते ०.५ किलो

३) पिकाचे नाव – कोबी

- सुधारीत बियाणे – प्राईड ऑफ इंडीया, गोल्डन एकर, अर्ली ड्रमहेड

- प्रती हेक्टरी बियाणे – ०.६ ते ०.७५ किलो

४) पिकाचे नाव – फुलकोबी

- सुधारीत जाती – ६९-डी, पुसा सिंथेटीक, पुसा दिपाली, कुआरी, इम्प्रुव्हड जपानीज

- प्रती हेक्टरी बियाणे – ०.६ ते ०.७५ किलो

५) पिकाचे नाव - मिरची -

- सुधारीत जाती – ज्वाला, पी.सी-१, एन.पी.-४६, ए.सी.ए.-९६०, फुले ज्योती, अग्नीरेखा, फुले सुर्यमुखी, फुले मुक्ता

६) पिकाचे नाव - ढोबळी मिरची-

- सुधारीत जाती – कँलिफोर्नीया वंडर, बुलनोज

- प्रती हेक्टरी बीयाणे – ०.४ किलो

७) पिकाचे नाव – भेंडी –

- सुधारीत जाती – पुसा सावनी, सिलेक्शन २-२, परभणी क्रांती, अर्का अनामिका, फुले किर्ती (सं), फुले उत्कर्षा

- प्रती हेक्टरी बियाणे – १२ किलो

८) पिकाचे नाव – मुळा

- सुधारीत जाती – जापनीज व्हाईट, पुसा देशी, पुसा चेतकी, पुसा रेशमी, गणेश सिंथेटीक

- प्रती हेक्टरी बियाणे – ८ ते १० किलो

९) पिकाचे नाव – मेथी

- सुधारीत जाती – नं-४७, नं-१४, पुसा अर्लि बंचिंग, कस्तुरी, आर.एम.टी.१
- प्रती हेक्टरी बियाणे – ३५ ते ४० किलो

१०) पिकाचे नाव - पालक –

- सुधारीत जाती - पुसा ज्योती, ऑल ग्रीन
- प्रती हेक्टरी बियाणे – ८ ते १० किलो

११) पिकाचे नाव - घेवडा

- सुधारीत जाती – कंटेडर, पुसा पार्वती, अर्का कोमल, व्ही.एल.५, जंपा, एच.आर.३५, पंत अनुपमा, फुले सुरेखा, फुले सुयश,
- प्रती हेक्टरी बियाणे – ४० किलो

टीप – वांगी, टोमॅटो या बियाण्यांच्या पेरणीपुर्वी एक किलो बियाण्यास ३ ग्रॅम थायरम चोळावे कोबी व फुलकोबीचे बियाणे पेरणीपुर्वी गरम पाण्यात ५० सें.ग्रे. अर्धा तास किंवा स्ट्रेप्टोसायक्लीनमध्ये (१०० पीपीएम) २ तास किंवा १ टक्का मरक्युरीक क्लोराईड १ ग्रॅम, १ लिटर पाण्यामध्ये ३० मिनिटे बुडवून नंतर बी सावलीत वाळवावे. नंतर त्यावर ट्रायकोडर्मा व अँझोटोबॅक्टर जीवाणूची प्रत्येकी २५० ग्रॅम प्रती १० किलो बियाण्यावर प्रक्रीया करावी.

२. सर्व भाजीपाला (टोमॅटो, वांगी, कांदा, बटाटा, इ.) पिकामध्ये पुर्णलागण झाल्यानंतर २० ते २५ दिवसांनी करपा रोग नियंत्रणासाठी क्लोरोथॅलोनील २० ग्रॅम किंवा मॅन्कोझेब किंवा कॉपर ऑक्झीक्लोराईड (२५ ग्रॅम + स्टीकर १० मिली) प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. आवश्यकतेनुसार पुढील फवारण्या १० दिवसांच्या अंतराने करा.

३. कांदा, वांगी, मिरची टोमॅटो, बटाटा या पिकामध्ये आंतरमशागत करून पिक स्वच्छ ठेवावे. तसेच पाण्याची आवश्यकता असल्यास पाणी नियमीत द्यावे. रोग व किडीचा बंदोबस्त वेळेत करावा.

४. भोपळावर्गीय भाजीपाला (काकडी, दोडका, कार्ले,दुधी भोपळा, घोसाळी इ.) पिकावरील केवडा रोगाच्या नियंत्रणासाठी मॅन्कोझेब २५ ग्रॅम किंवा फॉसेटिल ए.एल. २५ ग्रॅम किंवा बोर्डो मिश्रण (०.६ टक्के) किंवा थायरम २० मि.ली. + स्टीकर १० मि.ली प्रती १० लिटर पाण्यातून फवारावे. रोग दिसताच पहिली फवारणी करावी व तो आटोक्यात येईपर्यत १० दिवसांच्या अंतराने नंतरच्या फवारण्या कराव्यात.

५. वाटाणा, टोमॅटो, मिरची, भेंडी, इ. भाजीपाला पिकावरील भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी पाण्यात मिसळणारा ८० टक्के गंधक २० ग्रॅम किंवा ट्रायडेमार्फ किंवा डिनोकॅप ७ मि.ली. + १० मि.ली. स्टीकर प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.तसेच वेलवर्गीय भाजीपाला पिकावरील भुरी रोग नियंत्रणासाठी ट्रायडीमेफॉन २० ग्रॅम किंवा ट्रायडेमार्फ किंवा डिनोकॅप १० मिली + स्टीकर १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. भाजीपाला पिकावरील विषाणूजन्य रोगाच्या

नियंत्रणासाठी पुर्नलागण झाल्यानंतर २० दिवसांनी प्रतीहेक्टरी १० किलो या प्रमाणात फोरेट हे किटकनाशख झाडाच्या खोडालगत जमिनीत टाकून लगेच पाणी द्यावे. तसेच रोगप्रसार करणा-या किडींच्या बंदोबस्तासाठी किटकनाशकांचा वापर करावा व रोगट झाडे उपटून त्यांचा नाश करावा.

फुलशेती –

१.गुलाबाच्या पानावरील काळ्या ठीपक्याच्या नियंत्रणासाठी ०.२५ टक्के कॉपर ऑक्झीक्लोराईड किंवा मँन्कोझेब ८ दिवसांच्या अंतराने फवारावे.
२. हरीतगृहातील जरबेराच्या पानावरील ठिपके व करपा रोग नियंत्रणासाठी बेनोमिल ०.१ टक्का, आठ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी.
३. शेवंतीच्या मुळकुजव्या रोग नियंत्रणासाठी ०.५ टक्के कॉपर ऑक्झीक्लोराईड १० ते १५ दिवसांच्या अंतराने बुंध्याजवळ ड्रेन्चींग करावे तसेच पावसाचे पाणी शेतामध्ये साचू देऊ नये.
४. शेवंतीवरील करपा व पानावरील ठीपके या रोगाच्या नियंत्रणासाठी ०.२५ टक्के मँन्कोझेब किंवा ०.२५ टक्के क्लोरथँलोनील १५ दिवसांच्या अंतराने फवारावे.
५. हंगामी फुलझाडामध्ये पावसाच्या पाण्याचा निचरा करून घ्यावा. मुळकुजव्या रोगाच्या नियंत्रणासाठी ०.५ टक्के कॉपर ऑक्झीक्लोराईडचे बुंध्याजवळ ड्रेन्चींग करावे तसेच पानावरील ठिपके व करपा रोग नियंत्रणासाठी ०.२५ टक्के मँन्कोझेब १५ दिवसांच्या अंतराने फवारावे.
वरील सर्व प्रकारच्या फवारणीच्या वेळी स्टीकर ( १ मि.ली. प्रती १० लिटर पाणी) वापरावे.

- पशु संवर्धन व दुग्धशास्त्र

तिहेरी संकरीत गाय फुले त्रिवेणी –

सर्वसाधारण उपलब्ध संकरीत गायीमधील वेगवेगळ्या गुणदोषांचा विचार करून त्यातील दोष कमी करून शेतक-यांना उपयुक्त ठरेल अशी फुले त्रिवेणी गाय महात्मा फुले कृषि विद्यापिठातील गो संशोधन व विकास प्रकल्पावर विकसीत केलेली आहे. या संकरीत गायीमध्ये होस्टेन फ्रिजीयन, जर्सी व गीर या जातीच्या रक्ताचा समावेश आहे. त्यामुळे अधिक दूध उत्पादन, अधिक फँट व उत्तम रोग प्रतिकारक क्षमता याचा त्रिवेणी संगम या तिहेरी संकरीत गायीमध्ये साधला आहे. या जातीचे एका वेताचे सरासरी दुग्धोत्पादन ३००० ते ३५०० लिटर असून (१० ते १२ लिटर प्रतीदिन) दुधातील फँटचे प्रमाण ३.८ ते ४.२ टक्के आहे. या जातीच्या कालवडी १८ ते २० महिन्यात वयात येतात व पहिल्या वेताचे वय २७ ते ३० महिने असते. या जातीचे वैशिष्ट्य म्हणजे या जातीच्या पुढील पिढ्यांची दुग्धोत्पादन क्षमताही मूळ पिढ्याएवढीच जवळपास राखली जाते.
अशाप्रकारे अधिक दूध उत्पादन, अधिक फँट, उत्तम रोग प्रतिकारक क्षमता, पहिल्या वेताचे वेळी कमी वय, कमी भाकडकाळ, दोन वेतातील कमी अंतर इत्यादी महत्वाच्या गुणधर्मामुळे ही

गाय शेतक-यांसाठी कामधेनू ठरत आहे. या जातीचे गोठीत विर्य महात्मा फुले कृषि विद्यापिठ, राहूरी येथे उपलब्ध आहे. तरी शेतकरी बांधवांनी त्याचा अवश्य लाभ घ्यावा.

संपर्क -

फुले त्रिवेणी – या जातीचे गोठीत विर्य मिळणेसाठी वरीष्ठ शास्त्रज्ञ, गो संशोधन व सुधार योजना, महात्मा फुले कृषि विद्यापिठ, राहुरी, जिल्हा-अहमदनगर, दूरध्वनी क्र- ९५२४२६-२४३३६१ येथे संपर्क साधावा किंवा विभाग प्रमुख, पशु विज्ञान व दुग्धशास्त्र विभाग, महात्मा फुले कृषि विद्यापिठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर, दुरध्वनी क्र.(९५२४२६) २४३२१३ येथे संपर्क साधावा.

**कृषि विज्ञान केंद्र**
**बारामती**

**Recommended field operations to be carried out in the month of August (Pune District)**
**Agronomy –**

**Adsali Sugarcane –**
1)Provide the second dose of 40% Nitrogen to the early planted adsali sugarcane crop after attaining 6-8 weeks.
2)Don't plant adsali sugarcane after 15th August. Provide the second dose of 160 kg Nitrogen (350 kg urea) to the crop of 6-8 week Mix urea in neem cake powder in proportion of 1:6 to enable the slow release of nitrogen from urea. Sprinkle some water on the mixture of urea and neem cake powder and mix it uniformly. This helps to stick neem cake powder on on urea particles. Application of neem cake is suggested during the second and fourth dose of nitrogen.
3)If the attach of stem borer exceeds 10% then rouge out dried rolled leaves and larvae from the base of plant and destroy them. After that spray the entire crop with Endosulphan 14ml mixed in 10 liters of water or carbaryl 50% 40gm mixed in 10 liters of water. if necessary carry out another 2-3 spraying with a gap of 15 days. Or use 3-4 Trichocards / hectare for 6 times 40-45 days after planting with a gap of 10 days.
4)Do not plant sugarcane in highly alkaline soil. Prior to the earthing up if iron deficiency appears than spray the crop with 0.5 % ferrous sulphates mixture with a gap of 15 days for 3-4 times. (mix 2.5 kg of ferrous sulphate in 500 liters of water). apply sulphates @ 20 – 25kg/ hectare by mixing in well decomposed FYM the furrow by placement method, at the time of sugarcane planting or earthing up.
5)Apply control measures for wooly aphids and mealy bugs by using last recommendation letter.

**Turmeric –**
1)Provide second dose of nitrogen.
2)Protect your crop.
3)Provide the second dose of 60 kg Nitrogen (160kg ureas) and complete earthing up operation to the turmeric crop which has attained 12 weeks.
4)Immediately after incidence of rhizome fly mix one of the insecticide from following list soil and then give one light irrigation.
-50 % granules of quinolphos (Ecalux) 20kg / hectare
-10 % phorate granules (Thimate) 20kg / ha.

-Dust Carbaryl 10 % powder of 20kg / ha.

**Kharif Jowar –**

1)Provide the second dose of 50-60 kg nitrogen to the 25-30kg days old crop.

2)To restore the moisture in soil and to compensate with the dry spells perform deep hoeing.

3)Carryout earthing up to the crop. If the dry spell occurs provide the crop with protective irrigations at critical growth stages of crop, according to the availability of water.

4)Immediately after the incidence of shoot borer. Shoot fly, aphids, Jassids on Jawar spray the crop with 5 % Neem powder extract or Endosulphan 35E.C. 14ml or dimethoate 30% 10ml + 10ml sticker mixed in 10 liter of water. or release 5 trichocards. For control of shoot fly and 10-15 thousand larvae of crysoperla carnae for control of aphids, Jassids.

5)Spray the Jawar crop with copper oxychloride @ 25gm mixed in 10 liters of water for control of helminthosporium blight likewise for control of downy mildew spray Ridomil MZ-72 40gm + 20gm urea mixed in 10 liters of water. carryout second spraying 15 days after first spraying.

**Paddy –**

1)Apply 20 kg of Blue green algae / hectare 8-10 days after paddy transplanting in paddy transplanting in paddy field. This enables to atmosphere Nitrogen upto 30kg per hectare. This also helps to control the wild algae which is growing in paddy field.

2)Control the weeds in the paddy field by carrying out weeding at every 15 days interval. Or spray herbicide butachlore (machete) 2-4 kg at 4-5 days after transplanting. Or thiobecarb 50 E.C. (Satern) at one-two weeks after transplanting mixedin 400-500 liters of water after imergence of weeds.

3)Remove out all the water from the paddy field before spraying weedicide and fill all the field with water at 24 hours after spraying.

4)Keep 2-5 cm to 5cm of water in paddy transplanted field to establish good rooting. Keep 5cm of water in the field upto grain filling stage.

**Bajra –**

1)Provide second dose of Nitrogen to the crop.

2)Protect your crop.

3)Keep your field weedfree.

4)Considering the soil moisture provide protective irrigation during grain filling stage of Bajra. Dust 1.5% quinolphos @ 20kg per hectare to control the blue beetles, sucking complex of late sown Bajra.

Likewise use light traps if possible.
5)Keep Bajra field clean by performing one weeding and hoeing before 30days after sowing. Provide second dose of 30kg Nitrogen (65kg Urea) to the hybrid Jawar at 30 days after sowing.
6)To control downy mildew of Bajra spray Ridomil M.Z-72 + 20gm Urea mixed in 10 liters of water. carryout second spraying at 15 days after sowing.

**Groundnut –**
1)Protect your crop.
2)Perform drum rolling operation to the erect varieties of groundnut at 35-45 days after sowing for formulation of more number of crops.
3)If incidence of two leaf eating caterpillars appears on each groundnut plant then take a spray 5% neem extract or dimethoate (Rogar) 10ml or carbaryl 50% @ 40gm or monocrotophos (Neocron) 15ml / 10 liter of water. To control the leaf root spot and rust disease of ground nut spray the crop with carbendazim (Bavistin) 5gm or tridemorph 7ml mixed in 10 liters of water.

**Sunflower –**
1)Provide second dose of Nitrogen. Provide 65kg urea 30 days after sowing.
2)Carryout inter cultivation and keep crop weed free.
3)Provide protective irrigations to the crop.
4)Immediately after incidence of pod borer and hairy caterpillar spray one of the following insecticide.

-5 % Neem extract or Endosulphan 35 E.C. 1000ml or quinolphos 25E.C. 1000ml mixed in 500 liters of water. collect and destroy egg. Egg masses and larvae of pest. Dust the crop with malathion 5% or quinolphos 1.5% or carbaryl 10 % powder 25kg per hectare. Or spray S.O.N.P.V. 500 EC per hectare mixed in 10 liters of water.

**Redgram –**
1)Rouge out and destroy rolled leaves of Redgram before start of flowering to control the attack of leaf roller.
2)Keep 5 pheromone traps in the field and determine the incidence level of pod borer. Hairy caterpillar etc. Get in touch with the Tahsil Agricultural officer for the availability of such pheromone traps.
3)Immediately after the incidence of 2-3 larvae of pod borer in every meter line at the flowering stage of the crop of if 8-10 adult moths of god borer seems inside pheromone trap then do following remedies.
-Spray the crop with quinolphos 25% 20ml mixed in 10 liters of water.
-Second spraying if 5% neem extract at 15 days after first spraying.

For this crush 5kg of neem seeds mix them in 10 liters of water and keep soaking overnight. Second day filter this through thin muscline cloth and remove suspension. Add water in this filtered solution and make final volume 100 liters. Then take ½ liter of solution in got and add 200 gms of soap powder in it. After this mix this all in 100 liter solution and carry out spraying or spray fenvelrate 5ml mixed in 10 liter of water.
-Carryout third spraying of S.A.N.P.V. 15 days after second spraying or at 5% infestation to the pod or spray Endosulphan 20ml mixed in 10 liters of water.
-Collect the beetles which are damaging to the flowers and kill them by dipping in kerosene mixed solution.
-Carryout frequent uprooting and destroying of plants which are affected by wilt and downy mildew disease.
-If it is not possible to spray insecticide, carryout dusting or 1.5 % quinolphos or 2% methyl parathion powder 20kg per lecture.

**Greengram, Blackgram, Cowpea etc. –**
-Protect your greengram, Blackgram, Cowpea etc. type of pulses from attack leaf eating caterpillar, aphids, Jassids, beetles etc.

Niger – Provide second dose of 10 kg N/ha to the crop one month after sowing.
Castor – Protect your crop.
If incidence of semi 100 per seems spray the crop with carbaryl 50% wettable powder 50gm or Endosulphan 15ml mixed in 10 liter water, If disease leaf spot appears then spray the crop with Mancozeb (Dithane M-45) or Blitox 25gm mixed in 10 liters of water.

Cotton – Protect your crop
-To control bollworm complex use 7-8 trichocards per hectare or spray quinolphos or Endosulphan @ 1000 ml / ha for two times with a gap 12-15 days. If the attack of jassids and sucking pest complex seems then release 10-15 thousand larvae of crysoperla carnae or carryout spraying of 5% neem extract or dimethoate 30% 1000ml mixed in 500 liters of water. To control mites on cotton spray the crop with 2 kg wettable sulphure mixed in 500 liters of water. Apply phorate one gram per diseased cotton plant. If the disease rending of leaves appears carryout spraying of 2% DAP if the disease bacterial blight seems on crop then spray with streptocycline 1gm + blitox 25gm mixed in 10 liters of water.

Soyabean –
1)carryout hoeing. Keep your field weedfree.

2)To control stemfly and leaf eating caterpillar spray the crop with 5% neemextract or S.O.N.P.V. 500 EL mixed in 500 liters of water of spray the crop with quinolphos 20ml mixed in 10 liters of water or dust 1.5 % quinolphos powder or 5% methyl parathion powder @ 20kg per hectare.
3)Keep your field weedfree by performing weedling at initial stages of crop.

**Fruit gardens, Vegetables and floriculture –**
**Fruit trees –**
1)The ber trees pruned in April/ May month or plant in last year can be regenerated with new variety by using shield budding. Propogation method.
2)Carryout softwood grafting on local mango trees.
3)Set up goals for fruit growing considering the availability of water.
4)Under the low rainfall zone to obtain maximum benefit of moisture collect water to the root zone crop.
5)Provide stick support to the fruits crops those are planted in the month of June
6)Provide the fertilizers to the mrugbahar held

**Fruit crops -**
1)To control the leaf and fruit spot disease of pomegranate fruit cancker of Guava and fruit rot of custard apple spray the crop with 0.1 Bordauxmixture or 10gm carbendazim or 10gm benomil or Mancozeb 25gm + sticker 10ml mixed in 10 liters of water.
2)To control the fruit sucking moth of pomegranate prepare mixture 50% malathion 20ml or diazizon 5ml + 20gm jaggery and 2 liters of water + 12gm vinegar, fill this poisonous mixture in plastic pot and keep one pot for 10 trees.
3)To achive integrated fruit borer, mites and leaf spot spray 5% neem extract or carbaryl 50% 40gm, water soluble sulphur 25gm + Copper oxychloride 25gm mixed in 10 liters of water.
4)To bring control of nematode on pomegranate field, after the end of bahar carryout horizontal – verticle ploughing. After that use 1500 kg/ ha. of neem cake for 2-3 times in a year.
5)To control the fruit rot disease of pomegranate spray the crop with streptocycline 50gm + Copper oxychloride 1250 gm. Mixed in 500 liters of water. carryout second spraying15 days after first spraying.
6)To control the leaf minar and leaf eating caterpillar of Acid lime spray the crop with dimethoate (Rogar) 15ml or carbaryl 50% 25gm mixed in 10 liters or water.
7)To control the thrips and downy mildew on grape spray the crop with malathion 10ml or dimethoate (Rogar) 10ml + 25gm copper

oxychloride or Bavistin 10gm mixed in 10 liters of water.
8)To control the leaf blight disease on grape spray the crop with Bavistin 10gm or copper fungicide 25gm mixed in 10 liters of water.
9)To control downy mildew and powdery mildew disease on grape spray 0.1% bordeumixture or dust 300 mesh sulphur 20kg / ha.
10)To protect ber from different pest and disease of ber.
-Spray then ber crop with 5 % neem extract or Endosulphan 15ml mixed in 10 liters of water before flowering to control leaf eating caterpillar, hairy caterpillar and fruit borer.
-If the size of hairy caterpillars increases then collect those larvae on ground by blending the tree and kill them by adding in kerosene mixed solution.
-When the tree is in flowering stage and more honeybees notices on tree then do not spray any insecticides.
-To achive integrated control on fruitfly and fruit borer spray the tree when it attains pea size with carbaryl 50% 50gm or Endosulphan 15ml or monocrotophos (Neocron) 15ml + water soluble sulphur 25gm or karathane 5ml mixed in 10 liters of water three to four times before 15 days of harvesting.
-To control powdery mildew, dust the tree with 300mesh sulphur powder 20kg / ha.

**Vegetables –**
1)To plant the Rabi vegetables sow the seeds of Tomato, Brinjal, Cabbage, Cauliflower, Sweet paper on raised beds. Treat the seeds of Tomato, Brinjal with Thiram 3gm per kg of seed before sowing. Dip the seeds of Cabbage and Cauliflower in hot water of 50C for half an hour or streptocycline (100ppm) 2 hours or in 0.1% Mercuric chloride (1gm in one liter) for 30 minutes and then dry in shade. Treat the seeds with trichoderma and azotobacter @ 250gm for 10 kg of seed.
2)Spray all vegetables crops 20-25 days after transplanting to control the blight, anthracnose disease with chlorothalonil 20gm or Mancozeb or copper oxychloride (25gm + 10ml sticker) mixed in 10 liters of water. carryout next spraying with 10 days interval according to the need.
3)Carryout inter cultivation and keep field weedfree in crops Onion, Brinjal, Chilli, Tomato, Potato.
4)To control the downy mildew disease on cucurbitaceous crops (Cucumber, Ridge gourd, Bitter gourd, Pumpkin etc.) spray the crop with Mancozeb 25gm or Fosital A.L.25gm or Bordaux mixture (0.6%) or Thiram 20ml + 10ml sticker mixed in 10 liters of water.
-immediately after incidence of disease carryout spraying and to bring under control the disease carryout spraying with the gap of 10 days.
5)To control the powdery mildew on Pea, Tomato, Chilli, Okra etc.

spray the crop with water soluble sulphur 80% 20gm or Tridemorph or dinocap 7ml + 10ml sticker mixed in 10 liters of water. likewise to control the powdery mildew on Cucurbitaceous crops spray the crop with tridemephon 20gm or tridemorph or dimocap 10ml + sticker 10ml mixed in 10 liters of water to control the virus diseases on vegetables 20 days after transplanting apply 10 kg phorate per hectare, near to the stem of the crop in the soil and then provide light irrigation. Likewise to control the disease. Spreading pests use some pesticides and uproot and destroy diseased plants.

**Floriculture –**

1)To control the black leaf spots on Rose spray the crop with 0.25 copper oxychloride or Mancozeb with a gap of 8 days.

2)To control the leaf spot and leaf blight on greenhouse gerbera spray the crop with 0.1% benomyl with a gap 8 days.

3)To control the rootrot disease of chrysanthemum drench the crop with 0.5% copperoxychloride with a gap 10-15 days. Do not allow the rainwater to stagnate in the field.

4)To control the blight and leaf spot disease of chrysanthemum spray the crop with 0.25% Mancozeb or 0.25% chlorothalonil with a gap of 15 days.

5)Drench out the success water in seasonal flowers. To control the root rot disease drench the crop with 0.5 % copper oxychloride and to control leaf spot and blight spray 0.25 % Mancozeb with a gap of 15 days. Add sticker (1ml / liter) during each spray.

**Krishi Vigyan Kendra,**
**Baramati.**